सोलापूर तरुण भारत, औरंगाबाद. सोमवार. २७ फेब्रुवारी २०१७.

# पतसंस्थाचालकांनी मानसिकता बदलावी!

## विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांचे प्रतिपादन



औरंगाबाद : पत नसलेल्या माणसला पत निर्माण क रून देण्याचे काम सहकारी पतसंस्था करीत आहेत. पतसंस्थाचालक जोपर्यंत आपली मानसिकता बदलणार नाहीत, तोपर्यंत त्यांची संस्था पुढे जाणार नाही असे प्रतिपादन राज्य विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी केले.

सिडको येथील जगद्गुरू संत तुकाराम नाट्यगृहात सहकार भारतीच्या देवगिरी प्रांतातर्फे आयोजित सहकार संगम कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते उपस्थित संस्थाचालकांना मार्गदर्शन करीत होते. आपले म्हणणे खरे असेलतर ऑडिटरला घाबरण्याचे काहीही कारण नाही, अशी मानसिकता पतसंस्था चालकांमध्ये आली पाहिजे. सहकार क्षेत्र भीतीपोटी चालवयचे नाहीतर ताठ मानेने चालवायला पाहिजे असे त्यांनी सांगितले. सध्या काही समस्यांमुळे पतसंस्था अडचणीत आहे, परंतु संस्थाचालकांनी हा काळ म्हणजे संस्था बळकटीचा काळ समजून कार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर सहकार भारतीचे अध्यक्ष संजय बिर्ला, प्रदेश उपध्यक्ष ओमप्रकाश कोयटे, देवगिरी नागरी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष व स्वगताध्यक्ष किशोर शितोळे, सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, सहकार संगमचे संयोजक डॉ. शांतीलाल शिंगी, राष्ट्रीय महिला प्रमुख संध्याताई कुलकर्णी, अध्यक्ष बबनराव जगाडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. तसेच सहकार भारतीतर्फे उपस्थित मान्यवरांचा मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सहकार सुगंधतर्फे आयोजित सहकार संगम कार्यक्रमात वास्तु रविराज संस्थेचे डॉ. रविराज अहिरराव यांनी बँकिंग किंवा आर्थिक क्षेत्रात वास्तुशास्त्राचे महत्व या विषयावर विवेचन केले. ते म्हणाले की, एखाद्या बँकेच्या वास्तुचे निरीक्षण केल्यानंतर त्या बँकेला काय समस्या येवू शकतात हे सांगणे महत्वाचे आहे. सायबर सुरक्षा व संगणकीकरण या विषयावर सादीकरण करताना अजय निकुंभ यांनी बँकेकडे असलेली माहिती ही त्या बँकेचे भांडवल असुन त्याची सुरक्षा करणे हे बँकेचे कर्तव्य असल्याचे सांगितले. पिओसिएट स्फॉटवेअर सोल्युशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत मुळे यांनी कोअर बँकिंग म्हणजे काय किंवा ते का करावे या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. अर्थसंकल्पाचा सहकारी संस्थांवर होणारा परिणामाबद्दल उपस्थित संस्थाचालकांना माहिती दिली. याप्रसंगी ओमप्रकाश कोयटे यांनी पतसंस्था चळवळीसमोरील आव्हाने उपस्थितांसमोर मांडली.

### बक्षीस पात्र संस्थांमध्ये

सहकार सुगंधतर्फे सहकारी पतसंस्था आणि सहकारी बँकांच्या वार्षिक अहवालासाठी आयोजित प्रतिबिंब पुरस्कारासाठी ७०० पतसंस्था आणि १५० बँकांनी त्यांचे वार्षिक अहवाल सादर केले होते. यापैकी कोकण विभागातून पहिले बक्षीस दि कल्याण जनत्ता सहकारी बँक लि. कल्याण, तृतीय बक्षीस राजपूर अर्ब को. ऑप. बँक लि. राजापूर, प. महाराष्ट्र विभागातून अहमदनगर मर्चंटस् को. ऑप. बँक लि., तृतीय, देवगिरी (औरंगाबाद) विभागातून प्रथम, लातूर अर्बन को. ऑप. बँक लि., द्वितीय श्री छत्रपती राजर्षी अर्बन को. ऑप. बँक लि. बीड, तृतीय अजिंठा अर्बन को. ऑप. बँक लि. औरंगाबाद सह एकूण ३० सहकारी बँकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.